महाराष्ट्र शासन

डॉ.किरण पाटील
उप सचिव

क्र. प्रपिवियो -२०१८/प्र.क्र.२९१/११-अे
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व
मत्स्यव्यवसाय विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- २१ डिसेंबर, २०१८

**विषय -** महावेध प्रकल्पांतर्गत स्वयंचलित हवामान केंद्राच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत..

महोदय,

कृषि विभागाने सार्वजनिक खाजगी भागीदारीतुन बांधा-मालकव्हा- चालवा(*Built-Own-Operate-BOO)* तत्वावर महावेध प्रकल्पाची अंमलबजावणीकरण्याकरिता निविदा प्रक्रियेतून मे.स्कायमेट वेदर सर्व्हिसेस प्रा.लि यांची प्रकल्प अंमलबजावणीसाठी सेवा पुरवठादार संस्था म्हणुन नियुक्ती केली आहे. या प्रकल्पाकरिता सर्व आर्थिक गुंतवणुक मे.स्कायमेट वेदर सर्व्हिसेस प्रा.लि यांनी केली आहे.

महसुल मंडळनिहाय स्वयंचलित हवामान केंद्र उभारणीकरिता जागांची निवड करणेबाबत दि.३० ऑगस्ट,२०१२ चे शासन निर्णयानुसार आपले अध्यक्षतेखाली समितीने निवड केलेल्या जागेवर स्वयंचलित हवामान केंद्रांच्या उभारणीकरिता जागा ७ वर्ष कालावधीसाठी उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच आपले जिल्ह्यातील महसुल मंडळामध्ये स्वयंचलित हवामान केंद्राची उभारणी करण्यात आली असुन सदर हवामान केंद्र कार्यान्वीत करण्यात आली आहेत. सदर स्वयंचलित हवामान केंद्राद्वारे तापमान,पर्जन्यमान,सापेक्ष आर्द्रता,वाऱ्याचा वेग आणि दिशा या हवामान विषयक घटकाची Real Time माहितीची नोंद दर १० मिनीटांनी होत आहे.

सद्यस्थितीत कार्यन्वित करण्यात आलेल्या स्वयंचलित हवामान केंद्रावरुन प्राप्त हवामान घटकांचा तपशील कृषि महाविद्यालय, पुणे स्थित मध्यवर्ती नियंत्रण केंद्रातील सर्व्हरवर उपलब्ध होत असुन http://mahavedh.com या संकेतस्थळावरुन राज्य शासनास उपलब्ध होत आहे. हवामान केंद्रावरुन उपलब्ध होणाऱ्या माहितीचा वापर करण्यासंदर्भात जिल्हास्तरीय कार्यालयांना महावेध पोर्टलचा लॉगिन आयडी व पासवर्ड देण्यात आले आहेत. महावेध प्रणालीद्वारे उपलब्ध होणाऱ्या माहितीचा वापर व्यावसायिक दृष्टीने होणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे. मदत व पुर्नवसन विभागास दुष्काळ संनियंत्रण प्रणालीकरिता महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र (MRSAC) या संस्थेस सदरची आकडेवारी उपलब्ध करण्यासंदर्भात शासन पत्र क्र एससीवाय-२०१८/प्र.क्र८९/म-७ दि.२७ ऑगस्ट,२०१८ नुसार निर्णय झाला आहे.

सदरील हवामान विषयक माहिती, नैसर्गिक आपत्ती मदत वाटप, हवामान आधारीत फळ पीक विमा योजना , प्रधान मंत्री पीक विमा योजनेमध्ये भाग घेतलेल्या शेतकऱ्यांचे क्लेम मंजुर करताना अत्यंत महत्वाची आहे. राज्यातील शेतकऱ्यांना हवामान घटक व कृषि हवामान सल्ला उपलब्ध होण्याच्या दृष्टीने स्कायमेट वेदर सर्व्हिसेस प्रा.लि. यांनी Skymet Weather App विकसीत केले आहे. सदर ॲप गुगल प्ले स्टोअरवर विनाशुल्क उपलब्ध करण्यात आलेले आहे. या ॲपच्या माध्यमातुन स्थानिक स्वयंचलित हवामान केंद्रात नोंद होत असलेल्या हवामान विषयक घटकाच्या नोंदी, हवामान अंदाज, कृषि हवामान सल्ला, हवामान अलर्ट मराठी भाषेत उपलब्ध होतात. या ॲप मध्ये सातत्याने सुधारणा करण्यात येत असुन जानेवारी,२०१९ दरम्यान सुधारीत ॲप प्रसारित करण्याचे प्रस्तावित आहे.

प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्यासाठी जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय संनियंत्रण समिती स्थापन करण्यात आलेली आहे. प्रस्तुत योजनेंतर्गत नव्याने प्राप्त

झालेल्या जोखमींचे संनियंत्रण करुन जास्तीत जास्त अर्जदारांना योजनेचा लाभ होण्याच्या दृष्टिकोणातून अर्जदारांकडून प्राप्त झालेले विमा दावे संबंधित विमा कंपनीस विहित कालमर्यादेत प्राप्त होतील, याची दक्षता घेण्यात यावी.

महावेध प्रणालीवरुन हवामान आकडेवारी, अलर्ट जिल्हाधिकारी कार्यालयांना दररोज ई-मेलद्वारे देण्याबाबत प्रणाली कार्यान्वित करण्यात येत आहे.त्याचप्रमाणे हवामान आधारित फळ पिक विमा योजनेकरीता हवामान जोखिम लागु होताच अधिसुचित क्षेत्राचा तपशील सुद्धा उपलब्ध करण्यासाठी प्रणाली कार्यान्वीत करण्यात येत आहे.

उपरोक्त संदर्भीय पत्र क्र ३ अन्वये महसुल मंडळामध्ये हवामान केंद्राच्या चोरी व तोडफोडीबाबत स्कायमेट वेदर सर्व्हिसेस प्रा.लि. यांनी कळविले आहे. स्कायमेट वेदर सर्व्हिसेस प्रा.लि यांचे प्रतिनिधी सबधित तालुक्याच्या पोलीस स्टेशनला तक्रार दाखल करण्यास गेले असता सदरील बाबतीत तक्रार दाखल करुन घेतली जात नसल्याचे कळविले आहे. त्यामुळे स्कायमेट वेदर सर्व्हिसेस प्रा.लि या कंपनीला चोरी अथवा तोडफोड झालेले केंद्र कार्यान्वित करणेबाबत अडचणी निर्माण होत आहेत. स्वयंचलित हवामान केंद्र कार्यान्वित नसेल तर जिल्हयातील शेतकऱ्यांना पिक विमा योजना तसेच हवामान आधारीत फळ पिक विमा योजना यांचा फायदा मिळण्यापासुन वंचित राहतील.

तरी आपणास सुचित करण्यात येते की, याबाबत गांभीर्य लक्षात घेवुन आपल्या जिल्ह्यातील स्वयंचलित हवामान केंद्राच्या चोरी व तोडफोडीबाबत संबधीत तालुक्याच्या पोलीस स्टेशनमध्ये तातडीने तक्रार दाखल करुन घेण्यासंबधी जिल्हा पोलीस अधिक्षक यांना सुचित करावे . त्याचप्रमाणे तलाठी /ग्राम सेवक यांना महसुल मंडळस्तरावरील स्वयंचलित हवामान केंद्राचे महत्व लक्षात घेता सदर केंद्र कायम स्वरुपी कार्यान्वित राहणेकरिता स्थानिक स्वराज्य संस्थाच्या माध्यमातुन पातळीवर हवामान केंद्राचे महत्व, आवश्यकता व संरक्षणाबाबत लोकजागृती करणेच्या सुचना आपले स्तरावरुन निर्गमीत करावे अशी आपणास विनंती आहे.

(डॉ.किरण पाटील)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी,
महाराष्ट्र राज्य.

प्रत-

१. अतिरिक्त मुख्य सचिव, (महसुल)
२. अतिरिक्त मुख्य सचिव, (मदत व पुनर्वसन)
३. सर्व विभागीय आयुक्त
४. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, पुणे
५. कृषि संचालक, (वि.प्र.) कृषि आयुक्तालय, पुणे
६. सर्व विभागीय कृषि सहसंचालक
७. मुख्य सांख्यिक, कृषि आयुक्तालय, पुणे
८. सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी.